**प्रेसनोट** **दि.१६/०५/२०१९**

## बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर

## उत्कृष्ट कामगिरी करणारे रिक्षा चालकांचा सत्कार सोहळा

आज दिनाक १६/५/२०१९ रोजी सकाळी १२.०० ते १३.३० वा चे दरम्यान बिबवेवाडी पोलीस ठाणे येथे कम्युनिटीग पोलीसींग च्या अनुशंगाने शिवनेरी रिक्षा संघटना व रिक्षा चालक यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकी मध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री करपे व सहकानगर वाहतुक विभागाचे पोलीस निरीक्षक श्री नवगिरे यांनी मार्गदर्शन केले.रिक्षा चालक यांना रिक्षा चालवित असताना बॅच लावणे तसेच गणवेश परिधान करणे व प्रवाशांशी सौजन्यांणे वागणे,गरजू ,जेष्ठ नागरिक ,महिला यांना मदत करणे रॉंग साईडने वाहन चालू नये ,भाडे नाकारु नये याबाबत मार्गदर्शन केले तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री करपे यांनी कम्युनिटिंग पोलीसिंगच्या संदर्भाने बडी कॉप,भरोसा सेल, व सेवा ॲप बाबत माहिती दिली. तसेच चैन स्नॅचिंगच्या जनजागृती संदर्भात रिक्षावर स्टिकर लावण्यात आले तसेच रिक्षा मालंकाच्या व चालकांच्या अडचणी जाणून घेण्यात आल्या. तसेच त्यांना पोलीसांनी सुरू केलेल्या सेवा बाबत मार्गदर्शन करुन पोलीसांनी सुरु केलेल्या सेवांची माहिती देण्यात आली.त्याबाबत त्यांचे अभिप्राय जाणून घेतले. सदर कार्याक्रमा दरम्यान दोन चांगले कामगिरी करणारे रिक्षा चालकांचा श्रीफळ व पुष्पगुच्छ देवुन गौरव करण्यात आला.

सदर बैठकीस,बिबवेवाडी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री करपे व सहकानगर वाहतुक विभागाचे पोलीस निरीक्षक श्री नवगिरे, पो.हवा.तणपुरे,खंडाळे पो.ना.दुधाने,खामकर, पो.शि.पवार, देवकाते, तसेच शिवनेरी रिक्षा संघटनेचे अध्यक्ष श्री.अशोक सांळेकर, आबा बाबर तसेच गोपनीयचे कर्मचारी व सहकारनगर वाहतुक विभागचे कर्मचाऱ्यांसह २०० ते २५० रिक्षा चालक व रिक्षा संघटनेचे सदस्य हजर होते.







